महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम
गुरुवार, दिनांक १२ जुलै, २०१८

(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे-

दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री :

(क) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा दिनांक १ एप्रिल, २०१६ ते ३१ मार्च, २०१७ या कालावधीचा वार्षिक अंकेक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा सत्तावीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) संसदीय कार्य मंत्री :

विधानसभेच्या **सन २०१८ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक २६ फेब्रुवारी, २०१८ ते दिनांक २८ मार्च, २०१८ या कालावधीत मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री महोदयांनी** विधानसभा सभागृहात **दिलेल्या एकूण ३४३ आश्वासनांची यादी,** तसेच **सन २०१८ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ३९० आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह,** सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(३) परिवहन मंत्री :

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(४) **खनिकर्म मंत्री** : महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(५) **रोजगार हमी मंत्री** : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना या योजनांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

चार : औचित्याचे मुद्दे.

पाच : सन २०१३-२०१४ या वर्षाच्या अधिक खर्चाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान.

सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु चर्चा न झालेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ व २)

(१) **सर्वश्री.सुनिल शिंदे, संतोष दानवे, ॲड. भीमराव धोंडे, श्री. मंगेश कुडाळकर, ॲड. गौतम चाबुकस्वार, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. सुरेश गोरे, नरेंद्र पवार, गणपत गायकवाड, किसन कथोरे, अबु आझमी, अस्लम शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहती मोडकळीस आल्याच्या तक्रारीत दिवसेंदिवस होत असलेली वाढ, तरीदेखील मुंबईतील पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहतींची देखभाल-दुरुस्ती केली जात असल्याबाबत प्रशासनाकडून वारंवार सांगण्यात येणे, वरळी (मुंबई) येथील चाळ क्रमांक २८ या पोलीस वसाहतीतील सार्वजनिक स्वच्छतागृहाचे छत कोसळून वंदना कदम ही गृहिणी जखमी झाल्याची दिनांक २६/०६/२०१८ रोजी घडलेली घटना, सदर घटनेमुळे या वसाहतींच्या देखभाल — दुरुस्तीबाबत प्रशासनाकडून करण्यात येत असलेला दावा फोल ठरणे, मुंबई उपनगरातील कुर्ला-नेहरुनगर येथील पोलीस वसाहतीतील १९ वसाहती जीर्ण झाल्यामुळे तेथील रहीवाशांनी सप्ततारा गृहनिर्माण संस्था (नियोजन) स्थापन करुन १९ इमारतींची पुनर्रचना करण्याबाबत म्हाडा प्राधिकरण तसेच शासनाकडे दिलेला प्रस्ताव, परंतु त्याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, कल्याण (पश्चिम)

येथील जोशी बागेजवळील पोलीस वसाहत, बिर्ला महाविद्यालयाजवळील पंधरा वसाहती आणि सिंडीकेट आयुक्त बंगल्याजवळील पाच पोलीस वसाहती धोकादायक अवस्थेत असणे, पिंपरी-चिंचवड येथील पोलीस वसाहतींची अवस्था दयनीय असल्याने पोलीसांच्या पत्नी आंदोलनाच्या पवित्र्यात असणे, पोलीस वसाहतीत राहणाऱ्या पोलिसांच्या दरमहा वेतनातून ३० टक्के इतकी रक्कम घरभाड्यापोटी शासनाकडून वसूल करण्यात येणे, तरीदेखील या वसाहतींत मुलभूत सोयी- सुविधांचा असलेला अभाव, मुंबईतील बहुतांश पोलीस वसाहती मोडकळीस आलेल्या असणे, सदर वसाहतीतून पोलीस कर्मचारी जीव मुठीत घेऊन वास्तव्य करीत असणे, तरीदेखील शासनाकडून या वसाहतींच्या देखभाल – दुरुस्तीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येत नसल्याने पोलीस बांधवांत आणि त्यांच्या कुटुंबियांत पसरलेली नाराजी, त्यामुळे मुंबईतील पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहतींच्या देखभाल –दुरुस्तीचा कालबद्ध कार्यक्रम हाती घेण्याबाबत तसेच मोडकळीस आलेल्या वसाहतींच्या पुनर्विकासाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **ॲड. पराग अळवणी, श्री. नरेंद्र पवार, कॅ.आर.तमिल सेल्वन, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. नरेंद्र मेहता, विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अस्लम शेख, अमर काळे, ॲड. यशोमती ठाकूर, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री बाळासाहेब थोरात, डी. पी. सावंत, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. कुणाल पाटील, अब्दुल सत्तार, हर्षवर्धन सपकाळ, योगेश सागर, सुनिल प्रभू, अमित देशमुख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षणमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात सुमारे ५० हजारांहून अधिक खासगी शिकवणी वर्गाचे फुटलेले पेव, अनेक शिकवणी वर्गाचे संचालक शिक्षण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांशी संगनमत करून पालकांची फसवणूक करत असणे, सरकारच्या शैक्षणिक यंत्रणेला आव्हान देणारी अशी समांतर शैक्षणिक व्यवस्था उभी राहणे, अधिकाधिक गुणांचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांच्या पालकांकडून लाखो रुपयांची सुरू असलेली लूट, दरवर्षी यातून कोट्यवधी रुपयांची होत असलेली उलाढाल, त्यामुळेच लातूरमध्ये एका खासगी शिकवणी वर्गाच्या संचालकाची व्यावसायिक स्पर्धेतून झालेली हत्या, कोट्यवधींची उलाढाल करणाऱ्या या व्यावसायिकांचे साम्राज्य आणि ऐश्वर्य पाहून खंडणी वसूल करणाऱ्या टोळयाही आता वाढल्या असणे, शाळा व्यवस्थापन आणि खाजगी शिकवणी वर्गांच्या संचालकांचे संगनमत असल्यामुळे शाळेतील वर्ग बंद व खाजगी शिकवणी वर्गाला भरमसाठ विद्यार्थी असे चित्र दिसत असणे, याबाबत खासगी शिकवणी वर्गाचा अनियंत्रित कारभार आणि पालकांची अनिर्बंध लुटमार थांबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

सात : शासकीय विधेयके :

(अ) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र विनियोजन (अधिक खर्च) विधेयक, २०१८.

(ब) पुर:स्थापनार्थ :-

(१) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८.

(२) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४ — महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१८.

(३) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ — नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) विधेयक, २०१८.

(क) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

(१) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनील केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री अमित झनक, डी.पी.सावंत, भारत भालके, वसंतराव चव्हाण, शेख आसिफ शेख रशीद, अमिन पटेल, राधाकृष्ण विखे पाटील, अबु आझमी, छगन भुजबळ, श्रीमती दीपिका चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८ — दिवाणी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२ — दिवाणी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनील केदार, बसवराज पाटील, अमिन पटेल, डी.पी.सावंत, वसंतराव चव्हाण, संतोष टारफे, अब्दुल सत्तार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२ — दिवाणी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही

सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२ — दिवाणी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२ — दिवाणी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री.दिलीप वळसे पाटील, अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, पृथ्वीराज चव्हाण, सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, हर्षवर्धन सपकाळ, सुरेश लाड, हनुमंत डोळस, भास्कर जाधव, संजय कदम, दत्तात्रय भरणे, पांडुरंग बरोरा, नरहरी झिरवाळ, संदिप नाईक, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, शशिकांत शिंदे, राहुल जगताप, दिपक चव्हाण, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री.जितेंद्र आव्हाड, वैभव पिचड, विजय भांबळे, प्रदीप जाधव (नाईक), राजेश टोपे, जयंत पाटील, भारत भालके, श्रीमती दीपिका चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ — महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ — महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बच्चू कडू, वि.स.स. यांचा**

प्रस्ताव :-

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री वसंतराव चव्हाण, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१

सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(३) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री.दिलीप वळसे पाटील, अजित पवार, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री.अमित झनक, डी.पी.सावंत, भारत भालके, वसंतराव चव्हाण, शेख आसिफ शेख रशीद, अमिन पटेल, राधाकृष्ण विखे पाटील, अबु आझमी, पृथ्वीराज चव्हाण, हर्षवर्धन सपकाळ, सुरेश लाड, हनुमंत डोळस, भास्कर जाधव, संजय कदम, दत्तात्रय भरणे, पांडुरंग बरोरा, नरहरी झिरवाळ, संदीप नाईक, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, शशिकांत शिंदे, राहुल जगताप, दिपक चव्हाण, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, वैभव पिचड, विजय भांबळे, प्रदीप जाधव (नाईक), राजेश टोपे, जयंत पाटील, श्रीमती दीपिका चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, डी.पी.सावंत, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री वसंतराव चव्हाण, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त

सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(४) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री.दिलीप वळसे पाटील, अजित पवार, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनील केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री.अमित झनक, डी.पी.सावंत, भारत भालके, वसंतराव चव्हाण, शेख आसिफ शेख रशीद, अमिन पटेल, राधाकृष्ण विखे पाटील, अबु आझमी, पृथ्वीराज चव्हाण, सुरेश लाड, हनुमत डोळस, भास्कर जाधव, संजय कदम, दत्तात्रय भरणे,

पांडुरंग बरोरा, नरहरी झिरवाळ, संदिप नाईक, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, शशिकांत शिंदे, राहुल जगताप, दिपक चव्हाण, डॉ.सतीश पाटील, डॉ.जितेंद्र आव्हाड, सर्वश्री.वैभव पिचड, विजय भांबळे, प्रदिप नाईक, राजेश टोपे, जयंत पाटील, छगन भुजबळ, श्रीमती दीपिका चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, डी.पी.सावंत, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री वसंतराव चव्हाण, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री छगन भुजबळ, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(५) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनील केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री.अमित झनक, डी.पी.सावंत, भारत भालके, वसंत चव्हाण, आसीफ शेख, रशीद शेख, अमीन पटेल, राधाकृष्ण विखे पाटील, अबू आसिम आजमी, छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — महाराष्ट्र सहकारी संस्था

(दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, डी.पी.सावंत, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री वसंतराव चव्हाण, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री छगन भुजबळ, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ,**

प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ड) विधानसभेने संमत केलेले विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १४१(१) अन्वये पुन्हा संमत करणे :-

सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५६ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१७.

(बुधवार, दिनांक ११ जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

आठ : सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, गणपतराव देशमुख, दिलीप वळसे-पाटील, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. भास्कर जाधव, अब्दुल सत्तार, गोपालदास अग्रवाल, अबु आझमी, मो. आरिफ नसिम खान, सुनिल केदार, दिलीप सोपल, मधुकरराव चव्हाण, ॲड. यशोमती ठाकूर, डॉ.सतिश पाटील, सर्वश्री.अमिन पटेल, डी. एस. अहिरे, राहुल मोटे, डी.पी. सावंत, हसन मुश्रीफ, बसवराज पाटील, शिवेंद्रसिंह भोसले, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, भारत भालके, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम थोपटे, रणजित कांबळे, डॉ. संतोष टारफे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशीराम पावरा, जे.पी.गावीत, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, अमर काळे, अमित झनक, कु.प्रणिती शिंदे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री. भाऊसाहेब कांबळे, शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री. अस्लम शेख, त्र्यंबकराव भिसे, जयकुमार गोरे, नितेश राणे, सिध्दाराम म्हेत्रे, पांडुरंग बरोरा, कालिदास कोळंबकर, संग्राम जगताप, विश्वजीत कदम, डॉ.मधुसूदन केंद्रे, श्री.नरहरी झिरवाळ, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)

"राज्यात मोठया प्रमाणात तूरीचे उत्पादन होऊनही पणन महासंघाने ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांकडून तूर, हरभरा खरेदी न करणे, नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांकडून हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करुन व्यापाऱ्यांनी केलेली शेतकऱ्यांची लूट, ऑनलाईन नोंदणी न करता तूर व मक्याची खरेदी पणन महासंघाने करूनही चुकारे प्रलंबित

असणे, बाहेरील देशातून तूरडाळ व हरभरा आयात केल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांकडील जवळपास २४ लाख ५१ हजार ८२४ क्विंटल तूर व हरभरा खरेदीअभावी शिल्लक असणे, खरेदी-विक्री संचालकांवर चुकीचे गुन्हे नोंदविणे, छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना ३४ हजार कोटींची जाहीर केलेली कर्जमाफी तथापि, प्रत्यक्षात केवळ १५ हजार कोटीचीच कर्जमाफी मिळणे, परिणामी शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा न होणे, शासनाच्या धोरणामुळेच राज्यात गेल्या साडेतीन वर्षाच्या काळात १७ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग पत्करणे, केंद्र शासनाने राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी निधी देण्यास दिलेला नकार, राज्यात सहकारी बँकांची अडवणूक केल्यामुळे पीक कर्जवाटप करण्यास जिल्हा बँकांना येत असलेल्या अडचणी, वन टाईम सेटलमेंटसाठी शेतकरी तयार असताना अनेक जिल्ह्यामध्ये पात्र शेतकऱ्यांच्या याद्या अद्यापही न आल्यामुळे राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्जवाटप न करता ऊसाच्या बिलातून कर्जाच्या रकमा वळत्या करुन घेणे, आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात पालकमंत्र्यांच्या हस्ते कर्जमाफीचे प्रमाणपत्र देऊनही पीक कर्जासाठी हेलपाटे मारावे लागणे, बुलढाणा व यवतमाळ जिल्ह्यात पीक कर्ज मंजुरीसाठी शेतकऱ्याच्या पत्नीकडे शरीरसुखाची मागणी होणे, डीजीटल स्वाक्षरी व ऑनलाईन ७/१२ योजना यशस्वी न होणे, आपल्या मागण्यांसाठी शांततेने आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करणे, चालू वर्षी अमरावती जिल्ह्यात बनावट बियाणे वितरीत झाल्याच्या उघडकीस आलेल्या घटना, पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत सन २०१७ च्या खरीप हंगामातील ९२ टक्के शेतकऱ्यांच्या बँक खात्याची माहिती बँकेतील खात्याशी जुळत असतानाही ४१.५० लाख विमाधारक शेतकऱ्यांना मदत नाकारुन एकूण २,२६९ कोटींच्या नुकसान भरपाईपैकी फक्त ७४७ कोटीचे वाटप करणे, कापसावरील बोंड अळीमुळे झालेले सुमारे ३००० कोटींचे नुकसान तसेच मावा व तुडतुड्यामुळे झालेली धानाची नुकसान भरपाई जाहीर करून अद्यापही न मिळणे, धर्मा पाटलाच्या मुलाला दिलेल्या आश्वासनाला फासलेला हरताळ, साखरेच्या दरात घसरण झाल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर वाढत चाललेली थकबाकी, त्यात पाकिस्तानातून साखर, तूर व काद्यांची आयात करुन राज्यातील शेतकऱ्यांच्या अडचणीमध्ये झालेली वाढ, कापसावर फवारणी करताना मृत झालेल्या शेतकऱ्यास मदत, दृष्टीहीन व अपंग शेतकऱ्यांना पीक कर्ज, आधारभूत किंमती, हमीभाव, वन हक्क कायदा तसेच सामाजिक योजनांची अंमलबजावणी करणे इ. मागण्याबाबत शासनाने दि. १३ मार्च, २०१८ रोजी सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार कोणतीच कार्यवाही न होणे, माहे मार्च, २०१७ पर्यंतच्या पेड-पेंडिंग ग्राहकांना विजेची जोडणी देण्याचे शासनाने सभागृहात मान्य करुनही अद्याप जोडणी न मिळणे, परिणामी ग्रामीण भागात दिवसभरातून अनेक वेळा वीज पुरवठा खंडित होणे, पुरेशा पायाभूत सुविधा नसल्याने ग्राहकांची गैरसोय होणे, ग्राम विद्युत सहाय्यक नियुक्तीबाबत दीड वर्षापूर्वी शासन निर्णय निर्गमित करून अद्यापही नियुक्त्या न करणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना, कार्यवाही व प्रतिक्रिया."

(बुधवार, दिनांक ११ जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात

दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

नऊ : डॉ.अनिल बोंडे, सर्वश्री सुभाष साबणे, समीर कुणावार, सुनिल प्रभू, राजेंद्र पाटणी, प्रकाश आबिटकर, डॉ.संजय कुटे, डॉ.जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री चरण वाघमारे, शंभुराज देसाई, उन्मेष पाटील, डॉ.शशिकांत खेडेकर, डॉ.सुनिल देशमुख, डॉ.संजय रायमुलकर, सर्वश्री बाबुराव पाचर्णे, राजाभाऊ वाजे, प्रशांत बंब, किशोर पाटील, ॲड. संजय धोटे, सर्वश्री चंद्रदीप नरके, हरिष पिंपळे, ज्ञानराज चौगुले, डॉ.पंकज भोयर, सर्वश्री सुरेश धानोरकर, संजीवरेड्डी बोदकुरवार, अनिल बाबर, कीर्तीकुमार ऊर्फ बंटी भांगडिया, सदानंद चव्हाण, प्रा.डॉ.अशोक उईके, सर्वश्री वैभव नाईक, तान्हाजी मुटकुळे, समीर मेघे, बाळासाहेब मुरकुटे, जगदीश मुळीक, विजय रहांगडाले, रणधीर सावरकर, संजय सावकारे, डी.मल्लिकार्जुन रेड्डी, शिवाजीराव नाईक, बाळासाहेब सानप, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-

"राज्यात केंद्र शासनाच्या शिफारशीनूसार १४ प्रमुख पिकांकरिता उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव जाहीर केल्याने शेतकऱ्यांच्या मनात शासनाबद्दल विश्वास निर्माण झालेला असणे, शेतकऱ्यांची जमिन सिंचित करण्याकरिता पंतप्रधान सिंचन योजनेबरोबरच बळीराजा जलसंजीवनी योजना राज्यात प्रभावीपणे कार्यान्वित करण्यात येणे, शेतकऱ्यांना युरिया, मिश्र खते, सेंद्रीय खते, बियाणे यांचा योग्य दरात नियमित पुरवठा होत असणे, अल्पभूधारक शेतकऱ्यांना मनरेगा अंतर्गत फळबाग लागवड योजनेसोबतच बहुभूधारक शेतकऱ्यांकरिता भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना कार्यान्वित करण्यात येणे, सदरहू योजनेमध्ये शेतकऱ्यांना १००% ठिबक सिंचनासह व अनुदानासह रोपे, कलम इ. पुरवठा करण्यात येणे, व्याघ्र प्रकल्पालगत असलेल्या शेतीला लागू करण्यात आलेल्या अनुदानीत कुंपण योजनेच्या धर्तीवर अन्य वनालगतच्या शेतीलाही वन्य प्राण्यांपासून संरक्षणाकरिता अनुदानीत कुंपण योजना लागू करण्याची आवश्यकता असणे, धडक सिंचन विहिरी, मागेल त्याला शेततळे, मनरेगा अंतर्गत विहिरी, ठिबक सिंचन योजना, कृषी यांत्रिकीकरण, प्रात्यक्षिक बियाणे पुरवठा योजना यांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, गट शेतीला देण्यात आलेल्या प्रोत्साहनामुळे शेतकऱ्यांची पणन व विक्री प्रक्रिया गट कंपनीद्वारे यशस्वीपणे राबविण्यात येणे, तूर, चना, ज्वारी, मका इ. शेतमालाची हमीभावाने खरेदी करण्यात येणे, भूमीधारी शेतकऱ्यांची वर्ग-२ ची जमिन वर्ग-१ मध्ये रुपांतरित करण्याचा व त्यायोगे राज्यातील गोरगरीब शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, कृषीपंप जोडणीच्या सन २०१७ पर्यंतच्या अर्जांचा निपटारा करण्यात येणे, शेतकऱ्यांचे कृषीपंपाचे विज देयके प्रलंबित असताना सुध्दा त्यांचा विज पुरवठा खंडीत न करण्याचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना देण्यात आलेला दिलासा, यवतमाळ जिल्ह्यात किटकनाशकांचा प्रादुर्भाव होऊन झालेल्या शेतकऱ्यांच्या बळींची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून करावयाची उपाययोजना, गारपीटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अल्पकालावधीमध्ये देण्यात आलेली मदत, बोंडअळी, तुडतुडेग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात आलेली मदत इ. बाबी विचारात घेऊन राज्यातील

शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

दहा : सर्वश्री अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री भास्कर जाधव, अब्दुल सत्तार, गोपालदास अग्रवाल, मो.आरिफ नसिम खान, सुनिल केदार, दिलीप सोपल, मधुकराव चव्हाण, डॉ.सतिश पाटील, सर्वश्री अमिन पटेल, डी. एस. अहिरे, राहुल मोटे, डी. पी. सावंत, हसन मुश्रीफ, बसवराज पाटील, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, भारत भालके, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम थोपटे, रणजित कांबळे, डॉ.संतोष टारफे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री प्रदिप जाधव-नाईक, कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशीराम पावरा, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, अमर काळे, अमित झनक, कु.प्रणिती शिंदे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री भाऊसाहेब कांबळे, शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री अस्लम शेख, त्र्यंबकराव भिसे, जयकुमार गोरे, नितेश राणे, सिध्दाराम म्हेत्रे, पांडुरंग बरोरा, कालिदास कोळंबकर, विश्वजीत कदम, संदिप नाईक, बबनराव शिंदे, दिपक चव्हाण, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-

"राज्यात पेट्रोल व डिझेलच्या दरात सातत्याने वाढ होत असून मागील चार वर्षात इंधनाच्या दराने उच्चांक गाठणे, एस.टी. प्रवासी भाड्यातही दरवाढ करावी लागल्यामुळे ग्रामीण प्रवाशांमध्ये पसरलेले नाराजीचे वातावरण, सदरची दरवाढ ही महागाईला चालना देणारी असणे, राज्यातील सर्वसामान्य जनतेला महागाईमुळे बसलेली झळ, घरगुती गॅसच्या दरात वाढ केल्याने महिलांचे आर्थिक नियोजन कोलमडणे, पेट्रोल व डिझेलला वस्तू आणि सेवा कराच्या कक्षेत आणण्यासाठी राज्याकडून प्रस्ताव पाठविण्यास सांगण्यात येऊनही त्याची अंमलबजावणी न होणे, जीएसटीच्या करप्रणालीतून सावरण्याचा प्रयत्न करणाऱ्या राज्य सरकारवरील कर्जाचा डोंगर दिवसेंदिवस वाढत असून त्यातच सरकारी महामंडळांना तब्बल २५ हजार ६४० कोटी रुपयांचा झालेला तोटा, राज्य सरकारच्या तिजोरीवर तब्बल ४ लाख ६२ हजार कोटी रुपयांचे कर्ज असताना पुन्हा ४२ हजार कोटींचे कर्ज काढण्याची केंद्राकडून मागितलेली परवानगी, त्यातच १ लाख कोटी रुपये खर्चाच्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनमुळे कर्जाचे ओझे वाढणे, सदर कर्जाची परतफेड येनच्या स्वरुपात करण्याबाबत जपानबरोबर झालेला करार, शासनाच्या विविध विभागात २ लाखाच्या वर रिक्त पदे असूनही ती न भरल्यामुळे विकासाच्या योजनांवर होणारा परिणाम, बेरोजगार, कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांमध्ये नोंदणीकृत बेरोजगारांच्या संख्येत होणारी वाढ, "इज ऑफ डुईंग बिझनेस" मध्ये राज्य तेराव्या क्रमांकावर जाणे, स्टार्ट-अप इंडियामध्ये महाराष्ट्राची झालेली पिछेहाट, राज्यातील कायदा व सुव्यवस्था हाताबाहेर गेली असून खून, दरोडे, चोरी, बलात्कार, महिलांच्या विनयभंगाच्या घटनांमध्ये झालेली वाढ, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करुन सायबर गुन्हेगारीच्या माध्यमातून जनतेची होत असलेली फसवणुक, आर्थिक फसवणुकीच्या

गुन्ह्यांमध्ये वाढ होऊन महिला व मुला-मुलींच्या अपहरणाचे वाढत असलेले प्रकार, पोलिसांच्या निवासस्थानांची झालेली दूरवस्था, पोलिसांना होणाऱ्या मारहाणीच्या घटनांमध्ये वाढ, अमली पदार्थाच्या माध्यमातून तरुण पिढी व्यसनाधिन होणे, रस्त्यावरील अपघातांना पायबंद घालण्यात अपयश आले असून रस्ते सुरक्षा अभियान राबविण्यात झालेली दिरंगाई, दिनांक ११ मे, २०१८ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या पूर्वनियोजित दंगल प्रकरणी पोलिसांनी घेतलेली बघ्याची भूमिका, दंगलीकरिता फ्लीप कार्टवर मागविलेली शस्त्रे, याकरिता फ्लीप कार्टवर बंदी घालण्याची आवश्यकता, राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यामध्ये होत असलेला भ्रष्टाचार, पोलीस भरतीत होत असलेले घोटाळे, सोशल मिडीयाद्वारे पसरविल्या जाणाऱ्या अफवांवर निर्बंध घालण्यास अपयश आल्याने साक्रीसह राज्यात विविध ठिकाणी वारंवार निरपराध लोकांचे जाणारे बळी, मागील तीन वर्षात मंत्री व अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आणूनही त्यांच्या चौकशीमध्ये केली जाणारी दिरंगाई अथवा चौकशीच न करणे, वाकडी (ता.जामनेर, जि.जळगाव) येथील दलित अल्पवयीन मुलांना करण्यात आलेली अमानुष मारहाण व त्यांची काढण्यात आलेली नग्न धिंड, भीमा-कोरेगांव दंगलीप्रकरणी मुख्य सुत्रधार मोकाट फिरत असून सामान्य नागरिकांना आरोपी म्हणून अटक करुन वेगळे चित्र निर्माण करण्याचा होत असलेला प्रयत्न, डॉ. दाभोळकर व कॉ. पानसरे यांचे मारेकरी शोधण्यात सरकारला अपयश आल्यामुळे न्यायालयाने तीव्र नापसंती व्यक्त करणे, नक्षलवाद्यांशी जोडून चळवळीतील कार्यकर्त्यांची करण्यात येणारी बदनामी, याप्रकरणी शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अकरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

(गुरुवार, दिनांक ५ जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि, चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्र. १ व २)

(१) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"पुर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, गोदिया, भंडारा या जिल्हयातील कृषी महाविद्यालयाच्या प्रशासकीय कामकाजाकरिता अधिकारी/कर्मचारी यांना वारंवार अकोला येथे जावे लागणे, अकोला येथील पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे विभाजन करून पुर्व विदर्भाकरिता चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही येथे नविन कृषी विद्यापीठाची स्थापना करण्याबाबत केळकर समितीने शासनास सादर केलेल्या अहवालात नमूद करणे,

सिंदेवाही येथे कृषी विद्यापीठ स्थापन करण्याकरिता सोयीसुविधा उपलब्ध असतानाही त्याकडे शासनाचे झालेल्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, सबब अकोला येथील पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे विभाजन करून चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही येथे नविन कृषी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **ॲड.राहुल कुल, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"पुणे जिल्हयातील खडकवासला पाटबंधारे विभागातंर्गत दौंड तालुक्यासह पूर्व हवेलीतून वाहणाऱ्या नवीन व जुना उजवा मुठा कालव्यातून (बेबी कॅनॉल) मोठ्या प्रमाणावर पाणी गळती सुरू असल्याची तक्रार नागरिकांनी कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग यांच्याकडे दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास करणे, नवीन मुठा कालव्यातून होणाऱ्या गळतीचे प्रमाण दोन वर्षापासून वाढल्याने दौंड तालुक्यातील बोरीऐंदी, सहजपूर, खामगाव, कासुर्डी, यवत, खुटबाव, केडगाव तसेच हवेली तालुक्यातील लोणी काळभोर, कुंजीरवाडी, सोरतापवाडी (जि.पुणे) येथील हजारो एकर शेती नापिक होण्याचे वाढलेले प्रमाण, जुना उजवा मुठा कालव्यातून (बेबी कॅनॉल) मधून वाहणाऱ्या या अशुद्ध पाण्यामुळे कालव्यालगतचे असलेले पिण्याचे पाणी दुषित होणे, नवीन व जुना मुठा कालव्याच्या दुरुस्ती व अस्तरीकरणासाठी असलेली २% खर्चाच्या मर्यादेमुळे अनेक दिवसांपासून हे काम प्रलंबित असल्यामुळे खर्चाची मर्यादा १०% करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(मंगळवार, दिनांक १० जुलै, २०१८ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (क्र. ३ व ४)

(३) **श्री.नितेश राणे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"नाणार (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील १४ गावे व गिर्ये, रामेश्वर (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील १६ गावांमध्ये ग्रीन रिफायनरी प्रकल्प उभारण्यासाठी शासनाने निर्णय घेऊन त्यासाठी दिनांक १८ मे, २०१७ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने १६ हजार एकर जमिन औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर करणे, सदरहू प्रकल्पासाठी लागणारी जमिन संपादनासाठी ३२ (२) ची नोटिस काढण्यात येणे, तेथील शेती, बागायती, मत्स्यव्यवसाय आदींवर विपरित परिणाम होवून त्यांच्या उदरनिवार्हाचा निर्माण झालेला प्रश्न, भूमीपुत्रांनी सदर जमिन औद्योगिक क्षेत्राकरिता न देण्याचे लेखी पत्र प्रशासनाकडे देऊनही त्याकडे केलेले दुर्लक्ष, सदर प्रकल्प रद्द करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी व

नागरिकांनी मागणी करूनही त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी त्यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"वाढत्या शहरीकरणामुळे मुंबईसह प्रमुख शहरांमध्ये पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणात पडत असलेला ताण, मुंबईतील सर्वात मोठी समस्या ही वाहतूक कोंडीची असून वाहनांच्या संख्येत देखील वाढ होणे, परंतु त्याकरिता लागणारी पार्किंग व्यवस्थेबाबत कोणतीच उपाययोजना करण्यात न येणे, वाहनतळाकरिता मुंबई शहरात भुयारी वाहनतळ व उभ्या पद्धतीने वाहनतळाची व्यवस्था करण्याची नितांत आवश्यकता तसेच वाहनतळासाठी असलेल्या आरक्षणामध्ये बदल न करता ते वाहनतळासाठीच वापरण्यात यावी, याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

विधान भवन,
नागपूर,
दिनांक : ११ जुलै, २०१८

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.